# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/अेयुआर/यु/६२/२००७/३१**
**तक्रार दाखल दिनांक ;- १८/१०/२००७**
**निकाल दिनांक ;- १७/१२/२००७**

**श्री राहुल सांडू धनेधर,**
प्लॉट नंबर ४९,गुरुमीतनगर,
गट नंबर १८, पडेगांव,
औरंगाबाद. अर्जदार/ग्राहक

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शहर मंडळ, औरंगाबाद.**

**विषय ;- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल)विनियम २००६च्या अंतर्गत गा-हाणे.**

१) अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र. विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल) विनियम २००६च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दिनांक १८/१०/२००७ रोजी दाखल

केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १८/१०/२००७ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०६/११/२००७ रोजी ठेवण्यात आली.

२)ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालील प्रमाणे आहे.

अर्जदार हा प्लॉट क्रमांक ४९, गट नबंर १८ पडेगांव येथे राहत असून त्याने घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतलेला आहे वीज वितरण कंपनी तर्फे त्याला वेळोवेळी देण्यात आलेल्या वीज वापराच्या बिलाचा भरणा त्याने नियमित पणे केलेला आहे.०५/०५/२००७ ते ०५/०६/२००७ या काळात त्याला मागिल रिडिंग ०००१ व चालू रिडिंग २७६ अशी दाखविण्यात येवून त्यातील फरक २२२५४ असा दाखविण्यात आला आहे. त्याच बिलात समायोजित युनिट २१९७९ अशी दाखवून एकूण ४४२३३ युनिट वीज वापराचे रुपये १५०७१५/- बिल देण्यात आले. त्यानतंर ०५/०६/२००७ते ०५/०७/२००७ या काळासाठी २८१ युनिट वीज वापराचे बिल रुपये १०७७/- व मागिल थकबाकी म्हणून रुपये १५०७१५/- अशी दाखवत एकूण १५१७९०/- रुपये रक्कमे चे बिल देण्यात आले आहे. या वाढिव बिला बाबत त्यांनी वीज वितरण कंपनीच्या छावणी ऊप विभागाकडे अनेक वेळा तक्रार केली त्याच प्रमाणे या प्रकणात वकिला मार्फत नोटीस सुध्दा पाठविण्यात आली असल्याचे त्यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे. त्यांना देण्यात आलेले चुकिचे वीज बिल दूरुस्त करुन देण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

३) दिनांक ०६/११/२००७ रोजी मंचासमोर झालेल्या सुनावणीच्या वेळी ग्राहक प्रतिनिधी श्री राहूल सांडू धनेधर उपस्थीत होते.वीज वितरण कंपनी, शहर विभाग यांचे नोडल अधिकारी श्री एस. जी. पवार उपस्थीत होते.त्यांनी या प्रकरणाची कागदपत्रे त्यांच्याकडे संबंधीत विभागाकडून उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे सुनावणी पुढे वाढविण्या करीता अर्ज दाखल केला. मंचाने त्यांची विनंती मान्य करुन पुढील सूनावणी दिनांक १३/११/२००७ रोजी निश्चीत केली.

४) दिनांक१३/११/०७ रोजी सुनावणीच्यावेळी महावितरण कंपनी तर्फे नोडल अधिकारी श्री पवार तसेच ग्राहक प्रतिनिधी श्री राहूल सांडू धनेधर उपस्थीत होते. नोडल अधिका-यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जबाब मंचात दाखल केला. ज्याची एक प्रत अर्जदाराच्या प्रतिनिधीस देण्यात आली. नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या जबाबानुसार अर्जदाराने दिनांक १७/०६/२००७ रोजी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षात अर्ज केला परंतू तेथील सुनावणीच्या वेळी ग्राहक हजर नव्हते त्यामुळे अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षा चा निर्णय देता आला नाही असे म्हटले आहे. नोडल अधिका-यांनी आपल्या जबाबात पुढे म्हटले आहे की, अर्जदाराच्या येथे लावण्यात आलेले जुने मिटर (मीटर क्रमांक ००१४८२१७) हे दिनांक १९/०५/२००७ रोजी बदलण्यात आले त्यावेळी त्या मीटरची रिडींग २४४१३ अशी होती. अर्जदाराच्या येथे लावण्यात आलेल्या नविन मिटर चा क्रमांक ००३१४७१४ असा असून त्याची सुरुवातिची रिडिंग ही ००००१ अशी आहे. ग्राहकाच्या तक्रारीवरुन त्यांचे जुने मिटर त्यांच्या उपस्थितीत टेस्ट करण्यात आले व ते बरोबर असल्याचे

अढळून आले. नोडल अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार ग्राहकाच्या वीज बिलात दाखवण्यात आलेले युनिट हे ॲक्युमुलेटेंड स्वरुपाचे असून त्यामुळे ग्राहकाला ज्यास्त रक्कमेचे बिल देण्यात आले आहे.मिटर रिडींग घेण्या-या व्यक्तीने योग्य रिडिंग न घेतल्यामुळे ग्राहकास समायोजित बिलासहीत एकून २२२५४ युनिट वापराचे रुपये १४७९३०/- रक्कमेचे बिल देण्यात आले आहे.ग्राहकाने तक्रार दाखल केल्यानंतर त्यास वरील देण्यात आलेले बिल ३१ महिन्याच्या कालावधित विभागून देण्यात आले व एकूण बिलातून रुपये ४००१६/- वजा करण्यात आले आहेत. तसेच वीज बिलातील ही चुक मीटर रिडरच्या चुकीमुळे असल्याचे त्यांनी आपल्या जबाबात म्हटले आहे.महावितरण कंपनी तर्फे अर्जदारास मे - जुन २००७ या महिन्याचे एकुण रुपये १५०७१५/ चे बिल मिळाल्यानंतर अर्जदाराने मंचाकडे या चुकीच्या बिलापोटी वीज पुरवठा खंडीत न करण्याबाबत अंतरिम आदेश पारीत करण्याची विनंती दिनांक १६/०८/२००७ रोजी केली होती. मंचाने या अर्जावर दिनांक २१/०८/२००७ रोजी सुनावणी घेवुन तक्रारीचे निवारण होईपर्यंत वीज पुरवठा खंडित करण्यात येवु नये असा अंतरिम आदेश महाराष्ट्र वीज नियामक आयोग अधिनियम ६.२ मध्ये मधील तरतूदी नुसार पारीत केला व अर्जदारास त्याचे गा-हाणे वीज वितरण कंपनीच्या अंतर्गत निवारण कक्षाकडे दाखल करण्याचे सांगण्यात आले.

५) मंचात नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या जबाबावरुन अर्जदाराने वीज कंपनीच्या अंतर्गत निवारण कक्षाकडे या वाढीव वीज बिला बाबत तक्रार दाखल केल्या नंतर त्यावर तक्रार निवारण कक्षाने कोणतेही सुनावणी घेतलेली दिसत नाही. नोडल अधिकारी यांनी ग्राहक उपस्थीत न राहील्यामुळे सुनावणी व निर्णय घेतला नसल्याचे मंचात दाखल केलेल्या जबाबात म्हटले आहे. वीज नियामक अयोगाने अधिनियम २००५ मधील तरतुदी प्रमाणे ग्राहकाने अंतर्गत कक्षाकडे

दाखल केलेल्या तक्रारीचे निवारण दोन महिन्याच्या कालावधीत करणे बंधनकारक आहे. ग्राहक उपस्थित नसेल तर ग्राहकाने दाखल केलेल्या कागद पत्रावरुन तसेच वीज वितरण कंपनीच्या संबंधीत विभागाकडून आलेल्या जबाबाच्या आधारावर एक तर्फे आदेश कक्षाने पारीत करने अपेक्षित होते.पण अंतर्गत निवारण कक्षाने हे न केल्यामुळे ग्राहकास मंचात तक्रार दाखल करावी लागली.

६) मंचा समोर दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रात वीज कंपनी तर्फे ग्राहकाचा वीज संच माडणीचा निरिक्षण अहवाल नोडल अधिकारी यांनी दाखल केला नसल्यामुळे व ग्राहाकास देण्यात आलेले समायोजित वीज बिल लक्ष्यात घेता मंचाने प्रत्यक्ष सुनावणी झाल्यानंतर त्याच दिवशी अर्जदाराच्या वीज संच मांडणीचे निरीक्षण करण्याचे ठरविले. दिनांक १३/११/२००७ दुपारी दीड वाजता ग्राहकाच्या वीज संच मांडणीचे निरिक्षण करण्यात आले. सदर निरिक्षणाच्या वेळी मंचा चे तीनही सदस्य, नोडल अधिकारी श्री एस. जी. पवार, ऊप कार्यकारी अभियंता छावणी ऊप विभाग श्री जी.एन. गायकवाड तसेच श्री वी.आर. कुलकर्णी, ज्युनिअर ईजिनिअर छावणी ऊप विभाग हे उपस्थित होते. अर्जदाराच्या वतीने ग्राहक प्रतिनिधी म्हणून श्री राहूल धनेधर हे उपस्थीत होते. या निरिक्षणाच्या वेळी मंचास ग्राहकाचा एकूण जोडलेला वीजभार हा १५२५ वॅट असा अढळून आला तसेच अर्जदाराच्या येथे लावलेल्या मिटरचा क्रमांक ३१४७१४ असा असून त्या वरील रिडिंग ही ११३९अशी अढळली ज्युनिअर ईजीनिअर श्री कुलकर्णी यांनी मीटर निरिक्षण करत असतांना दिनांक १५/०८/२००७ रोजी केलेल्या निरिक्षण अहवालाची प्रत नोडल अधिका-या मार्फत मंचा चे सदस्य सचिव यांनी दीली. या निरिक्षण अहवालावर ग्राहक प्रतिनिधीची सही नसल्याचे आढळले.

७) दोन्ही बाजूकडून मंचात दाखल करण्यात आलेल्या कागद पत्रावरुन व मंचासमोर झालेल्या सूनावणी वरुन असे आढळून येते की,अर्जदाराच्या येथे वीज वितरण कंपनी तर्फे आगस्ट २००२ मध्ये घरगुती वापरासाठी वीज पुरवठा करण्यात आला. नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल कलेल्या सी.पी.एल. चे अवलोकन केल्यावर अर्जदाराच्या येथे लावण्यात आलेला मिटर चा क्रमांक हा ००१४८२१७ असा असून मे २००७ पर्यंत याच मिटरवरील नोंदी प्रमाणे वीज वितरण कंपनी तर्फे अर्जदारास बिल देण्यात येत होते जो ते नियमितपणे भरत असल्याचे सी.पी.एल.च्या नोंदी वरुन आढळून येते. अर्जदारास ०५/०५/२००७ ते ०५/०६/२००७ या काळासाठी देण्यात आलेल्या बिलावर मागिल रिडिंग १ व चालू रिडिंग २७६ अशी दाखविण्यात आली असून त्यातील फरक २२२५४ असा दर्शविण्यात आला आहे.याच बिलात समायोजित युनिट म्हणून २१९७९ असे दाखवत या काळातील एकूण ४४२३३ वीज युनिट वापराचे बिल अर्जदारास देण्यात आले. अर्जदाराने या बिला बाबत वीज वितरण कंपनीच्या छावणी उप विभागाकडे तक्रार केलेली तसेच वकिला मार्फत नोटीस पाठवलेली असल्याचे आढळते.

८) निरीक्षण केल्यावर असे आढळून येते की, जरी अर्जदारास नविन वीज पुरवठा २७/०८/२००२ रोजी करण्यात आलेला असला तरी अर्जदारास पहिले वीज बिल हे जानेवारी २००३ मध्ये देण्यात आल्याचे आढळते. जानेवारी २००३ ते सप्टेबर २००४ या काळातील वीज मीटरवरील नोंदणी ही तीन आकडी आहे. नोव्हेंबर २००४ या बिलात मागिल रिडींग ९५५ अशी दाखविली गेली असून चालू रिडींग १०५५ अशी दाखवत (१०५५-९५५) शंभर युनिट वीज वापराचे बिल अर्जदारास देण्यात आले आहे. जानेवारी २००३ ते सप्टेंबर २००४ या

२००७/३१

पान ६

एकवीस महिन्याचा कालावधीत अर्जदाराचा वीज वापर हा सरासरी ५१ युनिट प्रतिमहा (सी.पी.एल वरील नोंदी या दोन महिन्याच्या कालावधीतील वीज वापराच्या आहेत.) असा आढळतो. वीज वितरण कंपनी तर्फे अर्जदारास देण्यात आलेल्या मे २००७ पर्यंत वीज बिला बाबत ग्राहकाची कोणतीही तक्रार नव्हती. सी.पी.एल. वर असलेल्या नोंदीवरुन मीटर स्टेटस हे बहुतांश नॉर्मल वेळी असे दाखवण्यात आले. मे २००७ मध्ये अर्जदारास २३६४ - २४३४ असे ७० युनिट वीज वापराचे बिल देण्यात आले. ०५/०५/२००७ते ०५/०६/२००७ या काळासाठी अर्जदरास देण्यात आलेल्या वीज बिलाचे निरिक्षण केल्यावर अर्जदारास २७६ अधिक २१९७९ असे एकूण २२२५४ युनिट वीज वापराचे बिल रुपये १४७९३०/- असे देण्यात आल्याचे दिसून येते. अर्जदाराचे मीटर हे १९/०५/२००७ रोजी बदलण्यात आलेले असल्याचे मीटर बदली अहवालावरुन दिसून येते.वीज वितरण कंपनी तर्फे देण्यात आलेल्या या बिलातील ४४२३३ युनिट वीज वापरा बाबत ग्राहकाची मुख्य तक्रार आहे.

९) नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलल्या जबाबावरुन तसेच त्यांनी वरिष्ठ अधिकारी यांना मंजूरी साठी पाठवण्यात आलेल्या दिनांक १४/०८/२००७ रोजीच्या बिल रिव्हीजन सिट हे निरिक्षण केल्यावर असे दिसून येते की, त्यांनी १९/०५/२००७ रोजी मीटर बदलत असतांना मीटर वरिल रिडिंग व नोव्हेंबर २००४,जेव्हा मीटरवरील नोंदी या चार आकडी अंकात आल्या त्या काळातील वीज वापराचा फरक २१९७९ अधिक २७६ बरोबर २२२५४ व एकूण २२२५४ अधिक २१९७९ असे एकूण ४४२३३ युनिट वीज वापराचे बिल अर्जदारस दिले आहे जे चुकिचे असल्याचे मंचाचे मत आहे. नोव्हेंबर २००४ ते मे २००७ या दरम्यान मीटर रिडरच्या चुकीमुळे ही रिडींग वाचन बरोबर झाले नाही. हे नोडल अधिका-याचे म्हणने स्विकारता येत नाही. कारण या एकतीस महिन्याच्या काळात

एकच मीटर रिडर ने ही रिडीग घेतल्या आहेत व या दरम्यान ग्राहकाच्या वीज मीटर चे निरीक्षण वितरण कंपनीच्या कोणत्याही अधिका-याने केलेले नाही.ही शक्यता स्विकारता येत नाही. त्यामुळे मीटर वरील नोंदी या पाच आकडयामध्ये नोव्हेबर २००४ पासून आल्या आहेत. हे नोडल अधिकारी यांचे म्हणणे स्विकारता येत नाही.
दिनांक १३/११/२००७ रोजी मंचाने जेव्हा अर्जदाराच्या वीज उभारणी संचाची पाहणी केली त्यावेळी छावणी ऊप विभागाचे ज्युनिअर ईजिनिअर श्री कुलकर्णी यांनी नोडल अधिका-या मार्फत अर्जदाराच्या वीज संच माडणीचा निरिक्षण अहवाल मंचाच्या सचिव सदस्य यांना दिला हा अहवाल दिनांक १५/०८/२००७ रोजी चा असून त्यावर ग्राहक प्रतिनिधीची सही नसल्याचे आढळून आले. त्याचप्रमाणे १५/०८/२००७ रोजी भारतीय स्वातंत्र्यदिनानिमीत्त कार्यालयीन सुटी असतांना या तारखेस केलेला निरिक्षण अहवाल हा संशायास्पद असून मंचास तो मान्य नाही म्हणून मंचास हा अहवाल स्विकारता येत नाही.अर्जदारास नविन वीज पुरवठा करतांना मीटर वरील नोंद काय होती या बाबतही नोडल अधिकारी यांनी कोणतीही कागदपत्रे मंचात दाखल केलेली नाहीत.यावरुन मीटर वरील सुरुवातीची रिडिंग ही किती आकडी होती व नतंर ती चार व पाच आकडयात केव्हा आली या बाबत अनुमान काढता येत नाही. अर्जदाराने वीज पुरवठा घेतल्यापासून ते सदरील तक्रार दाखल करेपर्यंत अर्जदाराच्या वीज वापराचे निरीक्षण केले असता असे आढळून येते.

अ) जानेवारी २००३ ते नोव्हेबर २००४ या काळात मीटर वरील नोंदी तीन आकडी असून या काळातील अर्जदाराचा सरासरी वीज वापर हा ५१ युनिट प्रतिमहा असा आहे.

ब) नोव्हेंबर २००४ ते मे २००७ या काळात अर्जदाराच्या वीज वापराची सरासरी ही ४९ युनिट अशी आढळते.

क) अर्जदाराच्या येथे नविन मीटर बसविल्या नंतर जुन २००७ ते नोव्हेंबर २००७ या काळात त्याचा वीज वापर हा १३८ ते २८१ असा आढळून येतो.

नोडल अधिकारी यांनी बिल रिव्हीजन करतांना नोव्हेंबर २००४ मध्ये असलेली मीटर रिडिंग व १९/०५/२००७ रोजी मीटर बदलतांना असलेली रिडिंग या फरक २१९७९ ही समायोजित रिडिंग म्हणून दाखवली आहे. या ३१ महिण्याच्या कालावधीतील अर्जदाराच्या वीज वापराची सरासरी काढल्यास ती ७५७ युनिट येते जे ग्राहकाचा सरासरी वीज वापर लक्ष्यात घेता,खुप अधिक प्रमाणात असल्यामुळे स्विकारता येत नाही. ग्राहकाचा १५२५ वॅट (१.५२५ के.डब्लू) वीज भार लक्ष्यात घेता जर त्याने २४ तास व तीस दिवस अंखडित वीज वापर केल्यास एकूण वीज वापर हा १०८० युनिट असा होतो. त्यामुळे मीटर चालू असतांना अशा प्रकारे वीज वापर करणे तसेच या काळादरम्यान लावण्यात आलेले चार तासाचे भारनियमन लक्ष्यात घेता अर्जदार सरासरी ७५७ युनिट वीज वापर करत असेल हे तांत्रिक दृष्ट्या स्विकारता येत नाही. अर्जदाराचा वीज वापर हा जून २००७ ते नोव्हेंबर २००७ या काळात सरासरी २०० युनिट असला तरी नोव्हेंबर २००४ ते मे २००७ पर्यंत वीज वापराचे सरासरी तीच कायम असेल असे ग्रहीत धरता येणार नाही.

भारतीय कायदा २००३ कलम ५६/२ यात नमूद असलेल्या तरतूदी नुसार जर मागिल दोन वर्षाच्या कालावधीत वीज बिलात थकबाकी दाखवली गेली नसेल तर ती वीज वितरण कंपनीस वसूल करता येत नाही. नोडल अधिकारी यांनी मीटर रिडरने घेतलेल्या चूकीच्या नोंदी मुळे हे ॲक्युमुलिटेंड बिल असल्याचे म्हटले असले तरी त्यांनी या प्रकरणात संबंधीतावर चौकशी किंवा कार्यवाही केल्याचे कोणतेही कागद पत्रे मंचात दाखल केलेली नाहीत.

वरील सर्व बाबीचे निरिक्षण केल्यावर मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) वीज कायदा २००३ मधील कलम ५६/२ नुसार अर्जदाराच्या बिलात दाखविण्यात आलेली थकबाकी रद्द बादल करण्यात येत असून अर्जदारास देण्यात आलेली ०५/०५/२००७ ते ०५/०६/२००७ या काळाचे व त्यापुढील सर्व वीज बिले रद्द करण्यात येत आहेत.

२) वरील प्रमाणे वीज बिल रद्द केल्यानंतर ३० दिवसाच्या आत अर्जदारास सुधारीत बिल देण्यात यावे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **विजय गो. जोशी** | **विष्णु अ. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/एयुआर/यु/६२/२००७/३१** **दिनांक ;-**

**प्रति,**

**१) कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद.**

**२) श्री राहुल सांडू धनेधर,**
**प्लॉट नंबर ४९,गुरुमीतनगर,**
**गट नंबर १८, पडेगांव, औरंगाबाद.**

**विषय ;-** क्र.सिजीआरएफ/एझेड/अेयुआर/यु/६२/२००७/३१
गा-हाण्याचा आदेश.

वरिल विषयातील गा-हाण्याचा आदेश या पत्रा सोबत जोडला आहे.

ग्राहकास, जर आदेश मान्य नसेल तर तो विद्युत लोकपाल ( खाली दिलेला पत्ता ) यांच्याकडे आपले गा-हाणे आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आंत दाखल करु शकता.

सोबत ;- वरिल प्रमाणे.

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा ईमारत,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.


प्रति,

कार्यकारी अभियंता (प्रशासन),<br>
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,<br>
म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ,<br>
औरंगाबाद.

विषयः- श्री राहुल सांडू धनेधर यांच्या आदेशा बाबत.

**( Case No. CGRF/AZ/AUR/U/62/2007/31 ).**

महोदय,

या सोबत उप कार्यकारी अभियंता छावणी उप विभाग यांचे मंचाच्या नावाने आलेले पत्र सोबत जोडले आहे. या बाबत चा योग्य तो खुलासा आपण संबधीतांना करावा तसेच सदरील आदेशा बाबत स्पष्टीकरणाची जरुरी असल्यास आपण मंचात कार्यलयीन वेळेत संपर्क साधू शकता.

ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone-2336172**

**No,CGRF/AZ/AUR/U//62/2007/31/** **Date :-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer,**
**M.S.E.D.C.L. O&M Urban Circle,**
**Aurangabad.**

**Sub**: Postponement of Grievance Case No.62/2007/31
**(Consumer No. 490011583854)**
**Ref:- Letter No.CGRF/AZ/AUR/U/62/2007/31/231**
**dt. 18.10.2007**

**Dear Sir**

With reference to the bove subject, the hearing of the grievance in respect of Shri Rahul Sandu Dhanedhar,Gurumitnagar, Plot No.49, Gut No.18, Padegon Aurangabad (Consumer No.490011583854) is **postponed and the next date of hearing is 13.11.2007 at 11.30 Hours**

You are therefore requested to be present along with the concerned in charge at the time of hearing .

**Member Secretary**
**C.G.R.F. Aurangabad**

**Copy to:-**
Shri Rahul Sandu Dhanedhar,
Gurumitnagar, Plot No.49, Gut No./18,
Padegon, Aurangabad
**For information and take a note of hearing date and time.**